MHKO100004192023

**नियमीत दिवाणी दावा क्र. १०४/२०२३**

तबरेज मुल्ला वगैरे.
//वि//
चंद्रकांत कदम वगैरे.

**निशाणी क्र. ५७ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचेविरुध्द झालेला "विना कैफियत" चा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादींतर्फे प्रस्तुत अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना समन्सची बजावणी झालेली आहे. परंतु, त्यांनी मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८, नियम १ प्रमाणे प्रतिवादींना दाव्याचे समन्सची बजावणी झालेपासून ३० दिवसांच्या आत अथवा न्यायालयाच्या परवानगीने जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफियत सादर करता येते. परंतु, प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.१ यांना दिनांक १५/०५/२०२३ रोजी समन्सची बजावणी होऊन ते हजर झाले. परंतु, त्यांनी कैफियत दाखल न केल्यामुळे त्यांचेविरुध्द दिनांक २४/०८/२०२३ रोजी विना कैफियत आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक २१/०१/२०२५ रोजी दाखल केलेला आहे.

०३. प्रस्तुत अर्जात प्रतिवादी क्र.१ यांनी असे कारण नमुद केलेले आहे की, त्यांना रमाई आवास योजनेअंतर्गत घरकुल मंजुर झाले असुन त्यासंदर्भातील तसेच दावा मिळकती संदर्भातील अन्य काही आवश्यक कागदपत्रे व माहिती उपलब्ध न झालेने विहित मुदतीत कैफियत देता आलेली नाही. त्यामुळे, प्रतिवादी यांना वादीचे दावेस कैफियत व म्हणणे मुदतीत सादर करता आले नाही. प्रत्यक्षात सदर कारण व प्रतिवादी हजर झाल्याचा काळ विचारात घेतले असता, सदर कारण संयुक्तीक वाटत नाही. परंतु, प्रकरणाची गुण-दोषावर निर्गती करण्यासाठी प्रतिवादी यांना त्यांचा बचाव मांडणेकामी संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे, प्रतिवादी यांना त्यांची कैफियत सादर करु देणे मला योग्य वाटते. वर नमुद प्रमाणे प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज विलंबाने

दाखल केलेला असल्याने प्रस्तुत अर्ज खर्चासह मंजूर करणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**-: आदेश :-**

०१. अर्ज रक्कम रु.३००/- (रुपये तीनशे फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

०२. खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.१ यांनी पुढील तारखेपर्यंत वादी यांना अदा करावी.

०३. खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी क्र.१ यांना त्यांची कैफियत सादर करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

(खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SACHIN DURGASHANKAR MEHTA
Date: 2025.06.18 10:59:20 +0530

**( एस. डी. मेहता )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः १७/०६/२०२५.

:: <u>CERTIFICATE</u> ::

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. D. Mehta,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 17/06/2025 |
| Order signed by P.O. on | 17/06/2025 |
| Order uploaded on | 18/06/2025 |